**TARUN BHARAT (Marathi)** **Page No. 16**

**Date: 10January 2020**

# खो–खो खेळाडू दिपेश वेळीप भारताच्या संभाव्य संघात

**मडगाव** : गोव्याचा राष्ट्रीय खो–खो खेळाडू दिपेश वेळीप याची भारतीर खो–खो संभाव्य संघात चाचणीसाठी निवड झाली आहे. चौथ्या आशियाई खो–खो अजिंक्यपद स्पर्धा आणि आंतरराष्ट्रीय खो–खो स्पर्धेचे आयोजन होणार असून यासाठी भारतीय खो–खो संघाची निवड करण्यात येणार आहे. दिपेशने आतापर्यंत राष्ट्रीय पातळीवरील खो–खो स्पर्धेत सात वेळा गोव्याचे प्रतिनिधीत्व केले आहे.



नवी दिल्लीच्या पंडीत जवाहरलाल नेहरु स्टेडियमवर भारतीय संघ निवड चाचणी शिबिराचे आयोजन १० जानेवारीपासून करण्यात येणार असून यासाठी मोरपिर्ला येथील दिपेश भिसो वेळीप या गोव्याच्या एकमेव खो–खो खेळाडूची निवड भारतीय खो–खो महासंघाने केली आहे.दिपेशच्या नियुक्तीचे गोवा खो–खो संघटनेचे चेअरमन गोकुळदास शिरोडकर व सचिव सुनील वेळीप यांनी अभिनंदन केले आहे.

तरुण भारत Fri, 10 January 2020
epaper.tarunbharat.com/c/47829230

**THE GOAN and GOAN VARTA** Date: 31-01-2020

**CES COLLEGE OF ARTS AND COMMERCE**

**CUNCOLIM, GOA. 403 703. Tel 08322865210**

**https://cescollege.ac.in/ Email cuncolimcollege@gmail.com**

## SHORT TENDER NOTICE

TENDER NOTICE NO.: CE/N-01/2020

**Name of Work: Tender No. CES/01/2020: Construction of Additional Classrooms for CES College at Cuncolim, Goa.**

ESTIMATED COST: Rs.57,11,600/- TIME OF COMPLETION: THREE (3) MONTHS

COST OF TENDER DOCUMENT: Rs.2,000/- EMD: Rs.58,000/-

TENDER SALES FROM 31.01.2020 to 11.02.2020

DATE OF SUBMISSION: 12.02.2020 upto 11.00hrs.

DATE OF OPENING OF TECHNICAL BID (COVER No.1): 12.02.2020

For further details and general inquiries, prospective bidders may contact the College Office, during working hours.

**Principal**

Scanned with CamScanner

LOKMAT (Marathi) (page: 7) Date: 31-01-2020

# खासगी विद्यापीठाची गरज आहे का?



जर सरकार राज्यात खासगी विद्यापीठ स्थापन करण्याचा विचार करीत असेल तर आधी यावर शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ , जाणकार , शिक्षक, प्राचार्य यांच्याशी विचार विनिमय करणे गरजेचे आहे. विद्यापीठ व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी आहे की सामान्य अभ्यासक्रमासाठी यावर स्पष्टीकरण द्यायला हवे. महत्त्वाचे म्हणजे आपल्याला खासगी विद्यापीठाची गरज आहे का? जे विद्यापीठ आहे त्या विद्यापीठाकडे उद्योगाशी सांगड घालणारे अभ्यासक्रम सुरु करणे शक्य नाही काय? खासगी विद्यापीठात प्रवेश घेण्यासारखी आपल्या विद्यार्थ्यांशी आर्थिक स्थिती आहे का? माझ्या मते जे आहे ते व्यवस्थित करा, दर्जा वाढवा, खासगी विद्यापीठाची गरज आहे का यावर आधी चर्चा करा.

-**डॉ.संजय देसाई,** प्राचार्य कुंकळ्ळी महाविद्यालय